(एकूण १० पाने)

# पदवी व पदव्युत्तर (बहि:स्थ व विद्यापीठेतर महाविद्यालयांसाठी)
# संस्कृत अभ्यासक्रम

## संस्कृत पालि प्राकृत अभ्यास मंडळ
## पुणे विद्यापीठ
## नवीन अभ्यासक्रमाचे प्रारूप
## (२००८-२००९)

## संस्कृत भाषेचे महत्त्व

प्राचीन भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी, शिलालेख,प्राचीन हस्तलिखिते यांच्या अभ्यासासाठी, भारतीय प्रादेशिक भाषांच्या विकासासाठी,भाषाविज्ञानाच्या अभ्यासासाठी,प्राचीन भारतीय वैज्ञानिक विचार जाणून घेण्यासाठी,भारतीय सामाजिक ,राजकीय, धार्मिक, आध्यत्मिक ,काव्यशास्त्रीय विचार समजून घेण्यासाठी, संस्कृत - पालि-प्राकृत भाषांचा अभ्यास महत्त्वाचा असणार आहे. यासाठी वैदिक साहित्य,रामायण-महाभारतासारखी आर्षकाव्ये, अभिजात संस्कृत वाङ्मय,शास्त्रीय वाङ्मय,आधुनिक संस्कृत वाङ्मय यांचा अभ्यास नव्या दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे. यासाठी पुढील काही उद्दिष्टे समोर ठेवून नवीन अभ्यासक्रमांची मांडणी करणे शक्य आहे.

**अभ्यासक्रमाची उद्दिष्टे :**

१. परंपरेचे रक्षण करीत असतांना आधुनिक प्रवाहाशी सुसंगत सांगड घालण्याचा प्रयत्न करणे.

२. संस्कृत भाषा आणि साहित्य यांच्या अध्ययनासाठी विद्यार्थांना प्रेरित करणे

३. संस्कृत अध्ययन करतांना प्राचीन आणि आधुनिक दोन्ही अध्ययन परंपरांची सांगड घालणे.

४. भारतीय परंपरेचा ठेवा असणाऱ्या संस्कृत ग्रांथांच्या अध्ययनासाठी प्रेरित करणे. तत्त्वज्ञानात्मक विचार,भारतीय इतिहास आणि संस्कृती,शास्त्रीय आणि तांत्रिक विषयांची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे

५. संस्कृत अध्ययनाचे भारतीय एकात्मतेसाठी महत्त्व पटवून देणे

६. संस्कृत अध्ययनाद्वारा नैतिक,सामाजिक,आध्यात्मिक मूल्यांचा व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी उपयोग करणे.

७. संस्कृत ग्रंथांचा इतर भाषात अनुवाद करणे आणि इतर भाषातील ग्रंथांचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यासाठी क्षमता निर्माण करणे.

८. हस्तलिखित,शिलालेख यांच्या अध्ययनासाठी प्रेरित करणे.

९. संस्कृत ग्रंथांचे आकलन करून घेण्याची क्षमता निर्माण करणे (वाचन,पदच्छेद,अन्वय समास इ. आधारे)

१०. व्याकरणाची जाण निर्माण करणे.

११. संस्कृतचा संबंध उपजीविकेचे साधन म्हणून जोडणे .कॉम्प्युटरच्या आधारे संस्कृत ग्रंथांचे संरक्षण ,विश्लेषण इ. विषयक कार्य करणे.

१२. संस्कृत अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी होण्यासाठी सॉप्टवेअर तयार करणे.

१३. मायक्रोफिल्मिंग प्रशिक्षण

# संस्कृत अध्ययनाच्या भावी दिशा

कला शाखेचा विशेषत: भाषांचा अभ्यास करतांना व्यावसायिक दृष्टिकोनातून त्यांचा संबंध जोडतांना बऱ्याच मर्यादा पडतात . तरी त्यांचे अध्ययन सामाजिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे ठरते.

अन्नाशिवाय भावनिक सांस्कृतिक,वैचारिक,भूक माणसाला असते ती भूक भाषा ,तत्त्वज्ञान यामुळे पूर्ण होते. संस्कृत भाषेच्या अध्ययन/ अध्यापन प्रक्रियेत काही मर्यादा असल्या तरी संस्कृतचे अध्ययन अनिवार्यपणे होणे आवश्यक आहे. संस्कृत लोकमानसात रुजलेले असल्याने प्रभावी मूलगामी संस्कृत अध्ययन करणाऱ्यास विविध क्षेत्रात व्यावसायिक अनेक संधी उपलब्ध होऊ शकतील.

आधुनिक काळात संस्कृताध्यय कशाप्रकारे असावे हे पुढील मुद्दांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

१. मूलभूत संस्कृत अध्ययन
२. संस्कृत ग्रंथाचे प्रादेशिक भाषांमध्ये अनुवाद .
३. संस्कृत वाङ्मयातील चिंतन समाजासमोर विविध माध्यमातून सादर करणे (समाजाला समजतील अशा पुस्तिका कॅसेटस् ,सी.डी.इ.माध्यमांचा आधार घेणे, स्तोत्रे ,उपनिषदे यांचा आधार घेणे)
४. तुलनात्मक भाषा विज्ञान ,सौंदर्यशास्त्र यांचा अभ्यास करणे
५. हस्तलिखितांचे संकलन/संपादन प्रकाशन करणे त्यांचे अनुवाद करणे.
६. संस्कृत वाङ्मयावर विविध दृष्टिकोनातून संशोधन करणे.
७. प्रभावी शिक्षक / अध्यापक/ संशोधक बनणे.
८. संगणकाच्या प्रक्रियेत संस्कृत भाषेच्या रचनेचा उपयोग करून घेणे
९. संस्कृत ग्रंथाच्या संरक्षणासाठी ,त्यातील विचारांच्या प्रसारासाठी अनेक प्रकारचे सॉप्टवेअर तयार करणे.
१०. संस्कृत ग्रंथांचे विश्लेषण संगणकाच्या माध्यमातून करणे.
११. आयुर्वेद ,योगशास्त्र,भाषाशास्त्र यांचा अभ्यासकांना पूरक असे अभ्यासक्रम देणे
१२. फंक्शनल संस्कृत - व्याख्याने,प्रवचन,पौरोहित्य,ज्योतिष इ. चा. अभ्यास करणे. संस्कृत योग अभ्यासक्रम, हस्तलिखित संरक्षण-विविध ग्रंथांचे संगणकाच्या आधारे विश्लेषण .
१३. आंतरशाखीय अभ्यासक्रम - संस्कृत -योग, संस्कृत -आयुर्वेद,संस्कृत-गणित,संस्कृत-मानसशास्त्र, संस्कृत-समाजशास्त्र,संस्कृत-वाणिज्य,संस्कृत-प्राणिशास्त्र,वास्तुशास्त्र,संगीतशास्त्र,जलशास्त्र,कृषि शास्त्र संस्कृत तत्त्वज्ञान-पाश्चात्य तत्त्वज्ञान,संस्कृत-भारतीय भाषा (मराठी,हिंदी इ.)
    भाषांचा तुलनात्मक अभ्यास करून तो समाजासमोर मांडणे.
    संस्कृत व्याकरण-इतर भाषांचे व्याकरण
१४. सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी संस्कृत वाङ्मयाचा उपयोग करून घेणे (स्तोत्रे,भगवद्गीता,योगसूत्रे,उपनिषदे यांच्या आधारे ) यासाठी -स्तोत्रे, भगवद्गीता इ. चा परिचय करून देणारे अभ्यासक्रम तयार करणे. त्याचा प्रभावी प्रसार करणे.
१५. पारिभाषिक शब्द तयार करण्यासाठी संस्कृत भाषेची शब्द निर्मितीची प्रक्रिया समजावून घेणे त्यादृष्टीने अभ्यासक्रम तयार करणे.
    भावी काळात संस्कृत विद्यार्थ्याला संगणकाचे ज्ञान,इतर पाश्चात्य भाषांचे ज्ञान,इतर शास्त्रीचे सामान्यज्ञान असणे आवश्यक आहे.
१६. स्पर्धापरीक्षांची तयारी
१७. संस्कृतसाहित्य निर्मिती

# प्रथम वर्ष कला –संस्कृत

## २००८– २००९ या शैक्षणिक वर्षापासून प्रारंभ

**१. उद्दिष्टे –**

१. संस्कृत गद्यपद्य पाठ वाचन
२. पाठ्य पुस्तकातील काही भागाचे कंठस्थीकरण करणे
३. संस्कृतचा इतर भाषेत अनुवाद करणे.
४. संस्कृत अध्ययन करण्यासाविषयी आत्मविश्वास वाढविणे.
५. भारतीय संस्कृतीच्या मूल्यांचे संवर्धन करणे.

**२. अभ्यासक्रम –** **सुरभारती** (संस्कृतातील निवडक वेचे संकलन)

प्रकाशन – संगमनेर महाविद्यालय द्वारा प्रेरित संस्कृत संवर्धन मंडळ,संगमनेर

**३. परीक्षण पद्धती –**

### अ. नियमित विद्यार्थी (Internal)

**१. अंतर्गत मूल्यमापन –** गुण २०

* सत्रांत परीक्षा – गुण २०

(सत्रांत प्रश्नपत्रिका ६० गुणांची असेल त्या गुणांचे २० गुणांमध्ये परिवर्तन करावे.)

(सत्रांत प्रश्नपत्रिका लधुत्तरी प्रश्नांवर भर द्यावा.)

**२. अंतिम परीक्षा –** गुण ६०

अंतिम परीक्षा प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

| | |
|---|---|
| १. गद्य–पद्य यांचा अनुवाद – | गुण २० |
| २. संदर्भासह स्पष्टीकरण – | गुण १० |
| ३. दीर्घोत्तरी / टीपा | गुण २० |
| ४. पाठ्येतर संस्कृत उताऱ्याचे भाषांतर | गुण १० |

मैखिकी परीक्षा गुण २०

* संस्कृत संभाषण –संस्कृत स्वयं शिक्षक भाग १ सातवळेकर किंवा तत्सम पुस्तकाच्या आधारे गुण १०

* गद्य पद्य वाचन/स्तोत्र सुभाषिते यांचे कंठस्थीकरण गुण १०

### ब. बहि:स्थ विद्यार्थी

या विद्यार्थ्यांसाठी अंतिम प्रश्नपत्रिका ६० गुणांची असेल.त्या गुणांचे १०० गुणांमध्ये परिवर्तन करण्यात येईल.

* पाठ्यपुस्तकांची उपलब्धता.– संस्कृत प्रगत अध्ययन केंद्र, संस्कृत विभाग, पुणे विद्यापीठ, स.प.महाविद्यालय, फर्ग्युसन महाविद्यालय,संगमनेर महाविद्यालय,बी.एस.टी.महाविद्यालय व संबंधित महाविद्यालये

# प्रथम वर्ष वाणिज्य –संस्कृत

## २००८– २००९ या शैक्षणिक वर्षापासून प्रारंभ

**१. उद्दिष्टे –**

१. संस्कृत गद्यपद्य पाठ वाचन
२. पाठ्य पुस्तकातील काही भागाचे कंठस्थीकरण करणे
३. संस्कृतचा इतर भाषेत अनुवाद करणे.
४. संस्कृत अध्ययन करण्यासाविषयी आत्मविश्वास वाढविणे.
६. भारतीय संस्कृतीच्या मूल्यांचे संवर्धन करणे.

**२. अभ्यासक्रम** – **अमरभारती** (संस्कृतातील निवडक वेचे संकलन)

प्रकाशन – संगमनेर महाविद्यालय द्वारा प्रेरित संस्कृत संवर्धन मंडळ,संगमनेर

**३. परीक्षण पद्धती –**

**अ. नियमित विद्यार्थी (Internal)**

| **१. अंतर्गत मूल्यमापन –** गुण २० | **२. अंतिम परीक्षा –** गुण ६० |
|---|---|
| (सत्रांत प्रश्नपत्रिका ६० गुणांची असेल त्या गुणांचे २० गुणांमध्ये परिवर्तन करावे.) | अंतिम परीक्षा प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
| (सत्रांत प्रश्नपत्रिका लघूत्तरी प्रश्नांवर भर द्यावा.) | १. गद्य–पद्य यांचा अनुवाद – गुण २० |
| | २. संदर्भासह स्पष्टीकरण – गुण १० |
| | ३. दीर्घोत्तरी गुण २० |
| | ४. टीपा गुण १० |
| | मौखिकी परिक्षा –संस्कृत गद्य–पद्य वाचन गुण १० |
| | ✻ स्तोत्र सुभाषिते यांचे कंठस्थीकरण गुण १० |
| | ✻ सत्रांत परीक्षा – गुण २० |

**ब. बहि:स्थ विद्यार्थी**

या विद्यार्थ्यांसाठी अंतिम प्रश्नपत्रिका ६० गुणांची असेल.त्या गुणांचे १०० गुणांमध्ये परिवर्तन करण्यात येईल.

✻ पाठ्यपुस्तकांची उपलब्धता.– संस्कृत प्रगत अध्ययन केंद्र, संस्कृत विभाग, पुणे विद्यापीठ, स.प.महाविद्यालय,फर्ग्युसन महाविद्यालय,संगमनेर महाविद्यालय,बी.एस.टी.महाविद्यालय व संबंधित महाविद्यालये

बहि:स्थ विद्यार्थी व विद्यापीठेतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी

# पदव्युत्तर प्रथम वर्ष –संस्कृत

**२००८– २००९ या शैक्षणिक वर्षापासून प्रारंभ**

१. उद्दिष्टे –

१. संस्कृत वाङ्मय प्रकारांचा मूलगामी अभ्यास

२. इतर भाषांशी भाषिक दृष्ट्या तौलनिक अभ्यास

३. अध्यापनाच्या दृष्टिने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, क्षमता निर्माण करणे

४. संस्कृत वाङ्मय स्वत: वाचण्याची क्षमता निर्माण करणे.

५. आंतर शाखीय अध्ययनाला प्रेरित करणे.

## प्रथम सत्र

प्रश्नपत्र क्र.१ – वाल्मीकिरामायण – किष्किन्धाकाण्ड

प्रश्नपत्र क्र.२ – ऋग्वेद, अथर्व वेद, निवडक सूक्ते, यास्काचे निरुक्त

* **ऋग्वेद** – उषस् १.४८
  - विष्णु १.१५४
  - विश्वेदेवा: १.८९
  - नासदीय १०.१२९
  - वरुण २.२८
  - अश्विनौ १.११६
  - ऋभव: ४.३३
  - पूषन् ६.५३
* **अथर्ववेद** –
  - वरुणाथर्व संवाद ५.११
  - रोगनिवारण ४.१३
* **निरुक्त** –अध्याय पहिला

---

**संदर्भ ग्रंथ**

* ऋक्सूक्तवैजयंती – ह.दा.वेलणकर ,वैदिक संशोधन मंडळ, पुणे
* ऋक्सूक्तशती – ह.दा.वेलणकर,भारतीय विद्या भवन,मुंबई
* Hymns of Atharvaveda - M.Bloomfield Motilal Banarasidas New Delhi
* The Nighantu and the Nirukta with text and Eng. tr. by Laxman Sarup Motilal Banarasidas New Delhi
* वेददर्शन – रवींद्र मुळे,संत ज्ञानेश्वर वेदविद्या प्रतिष्ठान, औरंगाबाद
* यास्कप्रणीतं निरुक्तम् –मराठी अनुवाद व टीपा– रवींद्र मुळे,संगमनेर

**प्रश्नपत्र क्र.३** –S.K.3 (Special Groups ) (पुढीलपैकी एक ग्रुप विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी निवडावयाचा आहे)

जो ग्रुप निवडलेला आहे तोच ग्रुप चारही सत्रांसाठी घ्यावा लागेल.

**A.** **साहित्य**

अभिज्ञानशाकुन्तलम्

**B.** **वेदान्त**

माण्डूक्योपनिषद् – गौडपादकारिकांसह –

**C.** **व्याकरण**

* अष्टाध्यायी – ३.२.१ – १८८
* सिद्धांतकौमुदी अजन्त पुंलिड्.ग प्रकरण – १७८ ते २५६

**D** **वेद**

* ऋग्वेद – २.१– ३
* अथर्व वेद –१.१, १.३२, २.१, ३.४, ३.१२
* ऋग्वेदभाष्यभूमिका–पहिला निम्मा भाग
* वैदिक व्याकरण

---

| संदर्भ ग्रंथ (साहित्य) | | |
|---|---|---|
| | अभिज्ञानशाकुंतल – | डॉ.रा.शं.वाळिंबे, मराठी अनुवाद |
| | अभिज्ञानशाकुंतल – | डॉ.यदुनंदन मिश्र, चौखंबा प्रकाशन |
| | संस्कृत नाटके व नाटककार – | डॉ.गो.के.भट |
| | संस्कृत नाट्य सौंदर्य – | डॉ.के.ना.वाटवे |
| | कालिदास– | डॉ.वासुदेव विष्णु मिराशी |

---

**प्रश्नपत्र क्र.४** – सिद्धान्तकौमुदी (कारक प्रकरण)–

**संदर्भ ग्रंथ**

* वैयाकरण–सिद्धान्त–कौमुदी–डॉ.सरोजा भाटे, भांडारकर प्राच्याविद्या संशोधन मंदिर ,पुणे
* वैयाकरण–सिद्धान्त–कौमुदी–विभक्त्यर्थ (कारक)प्रकरणम् – श्रीधरानन्द घिल्डियाल,मोतीलाल बनारसीदास
* वैयाकरण–सिद्धान्त–कौमुदी–M.V.Mahashabde. Jaya Prakashan.
* वैयाकरण–सिद्धान्त–कौमुदी–भाग १ – महादेव दामोधर साठे, सखाराम विनायक आपटे
* संस्कृत व्याकरण में कारकतत्वानुशीलन– डॉ. उमाशंकर शर्मा 'ऋषि,' चौखम्बा सुरभारती प्रकाशन
* संस्कृत व्याकरणशास्त्र प्रवेश – डॉ.रवींद्र मुळे,संगमनेर

## द्वितीय सत्र

**प्रश्नपत्र क्र.१ – कादम्बरी शुकनासोपदेश**

**संदर्भ ग्रंथ**

- ✻ शुकनासोपदेश – रामपाल शास्त्री – चौखंबा प्रकाशन
- ✻ कादम्बरी – एम.आर.काळे – मोतीलाल बनारसीदास
- ✻ कादम्बरी– आर.डी.करमरकर
- ✻ बाणाची कादम्बरी – दुर्गा भागवत –वरदा प्रकाशन,पुणे

**प्रश्नपत्र क्र.२ –** ऋग्वेद, अथर्व वेद, निवडक सूक्ते, यास्काचे निरुक्त

✻ ऋग्वेद – मण्डूक ७.१०३
भिक्षु १०.११७
अग्नि ३.९०
इन्द्र ३.३२
यम १०.१४
सोम ८.४८
रुद्र २.३३

✻ अथर्ववेद – संज्ञान ३.३०
राज्ञ: पुन: स्थापनम् ३.४
सर्पविषनाशनम् ५.३

✻ निरुक्त – अध्याय दुसरा

**प्रश्नपत्र क्र.३** –S.K.3 (Special Groups ) (पुढीलपैकी एक ग्रुप विद्यार्थ्यांनी अभ्यासासाठी निवडावयाचा आहे)

**A.** **साहित्य**

शिशुपालवधम्

**B.** **वेदान्त**

ब्रह्मसूत्र – शांकरभाष्य (सूत्र क्र. १.१.१ – ४ , १.१.१२–१९)

**C.** **व्याकरण**

- ✻ महाभाष्यपस्पशाह्निकम्
- ✻ परमलघुमंजूषा (कारकार्थविचार)

**D** **वेद**

(ऋग्वेद ) २.२५, २.२८, २.३७, २.३९

(अथर्ववेद) ४.१६, ५.२२, ११.५, १५.१.१–८, १९.५३

- ✻ ऋग्वेदभाष्यभूमिका–दुसरा निम्मा भाग
- ✻ वैदिक व्याकरण

**संदर्भग्रंथ**

- ✻ शिशुपालवध – सर्ग ३ –४ डॉ.सौ.रुपाली कापरे, संगमनेर
- ✻ संस्कृत काव्याचे पंचप्राण – डॉ.के.ना.वाटवे

प्रश्नपत्र क्र.४ – भाषाशास्त्राची मूलतत्वे,

संस्कृत निबंध लेखन

**संदर्भग्रंथ–**

* भाषा आणि भाषाशास्त्र– श्री.न.गजेंद्रगडकर , व्हीनस प्रकाशन, पुणे १९९१
* भाषाविज्ञान (मू.ले.एफ मैक्समूलर) उदयनारायण तिवारी, मोतीलाल बनारसीदास दिल्ली १९७०
* Sanskrit Syntax, J.S. Speijer. Motilal Banarsidass. Delhi.
* भाषा विज्ञान एवं भाषाशास्त्र – डॉ.कपिलदेव द्विवेदी, विश्वविद्यालय प्रकाशन,वाराणसी

र.ज.मु.

डॉ.रवींद्र मुळे

अध्यक्ष संस्कृत पालि प्राकृत अभ्यास मंडळ

<u>जुन्या अभ्यासक्रमाशी नवीन अभ्यासक्रमाची समकक्षता</u>

नवीन अभ्यासक्रम २००८-२००९ पासून सुरू केले आहे.

| जुना अभ्यासक्रम | | नवीन अभ्यासक्रम |
|---|---|---|
| प्रश्नपत्रिका क्रमांक | S.K.1 | S.K.1 |
| | S.K.3 | S.K.2 |
| प्रथम वर्ष | S.K.5 (ग्रुप) | S.K.3 |
| | S.K.7 | S.K.4 |
| द्वितीय वर्ष | S.K.2 | S.K.5 |
| | S.K.4 | S.K.6 |
| | S.K.6 | S.K.7 |
| | S.K.8 | S.K.8 |

**डॉ.रवींद्र मुळे**

अध्यक्ष संस्कृत पालि प्राकृत अभ्यास मंडळ